(545)

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा

**आदेश** क्र.सी/कार्या-३डी/कावि-७९/२०११

श्रीमती डॅफनी वारापेन व इतर ३

**विरुध्द**

सेंट अॅन्थोनि स्कुल ट्रस्ट (सेंट अॅन्थेनिज इंस्टीट्युट)

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम-१९६६ लगत**
**महाराष्ट्र जमीन महसूल (स.ज.वि.ला) नियम-१९७१ च्या नियम १५ अन्वये**

**प्रस्तावना :**

प्रकरणी श्रीमती डॅफनी वारापेन व इतर यांनी त्यांचेकडील दि.२४/२/२०११ रोजीचे पत्रान्वये सेंट अॅन्थोनि स्कुल ट्रस्ट (सेंट अॅन्थेनिज इंस्टीट्युट) यांना भाडेपट्ट्याने देण्यांत आलेल्या मौ. बांद्रा ता. अंधेरी येथील न.भु.क्र. एफ-५१३बी मधील २४९.२ चौ.मी. जमिनीचा गैरवापर होत असल्याबाबत तक्रार केली होती. त्याबाबत जमिनीचे स्थळ निरिक्षण करुन तहसिलदार अंधेरी यांना चौकशी अहवाल सादर करण्यास कळविण्यात आले होते. त्यांनी सादर केलेल्या अहवालानुसार खालील प्रमाणे शर्तभंग आढळून आला आहे.

COLLECTOR जिल्हाधिकारी MUMBAI SUBURBAN DISTRICT मुंबई उपनगर जिल्हा

ज्या सेंट अॅन्योनी स्कुलला खेळाचे मैदानासाठी शासकीय जमीन प्रदान करणेंत आली हो‍ती आता ती शाळा बंद झाली आहे त्यामुळे न.भू.क्र. एफ-५१३अे व ५१३बी ह्या मिळकतीचा शाळेतील उपयोग मुलांना होत नाही. या क्रिांगणाचा वापर बास्केटबॉल, हॉकी तसेच इतर खेळ खेळण्यासाठी केला जातो. क्रिडांगणाचा उपयोग SAISA क्लबच्या सभासदांसाठी केला जातो, त्यामुळे शर्तभंग झाला आहे.

या प्रकरणात संस्थेस व तक्रारदार यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देवुन बाजू ऐकून घेण्यांत आली आहे. संस्थेने केलेले शर्तभंग, त्यावर मांडलेली बाजू, सादर केलेले लेखी उत्तर, कागदपत्र तसेच तक्रार दार यांनी मांडलेली बाजू, सादर केलेले लेखी उत्तर कागदपत्र इ. विचारात घेण्यात आले आहेत.

**प्रकरणाची पार्श्वभूमी.**

मौजे, बाद्रा, तालुका-अंधेरी येथल न.भु.क्र. एफ-५१३बी क्षेत्र २४९.२ चौ.मी. जमीन तात्कालिन जिल्हाधिकारी, मुंबई यांचेकडून सन-१९४७ साली खेळाचे मैदानासाठी १५ वर्षाचे भाडेपट्ट्याने सेंट अॅन्थो‍नि स्कुल ट्रस्टला प्रदान करणेंत आली होती. सदरचे भाडेपट्ट्याची मुदत सन-१९६२ रोजी संपुष्टात आली असून



Scanned by CamScanner

संस्थेने मुदत वाढवून मिळणेबाबत तसेच न.भू.क्र. एफ-५१३ए क्षेत्र १३२.१ चौ.मी. जमीन भाडेपट्ट्याने मिळणेबाबत विनंती केली होती. तद्नुषंगाने या कार्यालयाचे पत्र क्र. ११/३डी/एल/वशी-१३५८/२००१ दि.१२/१२/२००१ अन्वये शासनास अहवाल सादर करणेत आला आहे.

## संस्थेची बाजू :-

संस्थेने खालीलप्रमाणे आपली बाजू या प्रकरणामध्ये मांडली आहे.

१) मा. नगर दिवाणी न्यायालयाचे दि.१७/४/२००३ चे आदेशान्वये संस्थेचे नांव सेंट अॅन्थोनी स्कुल ट्रस्ट ऐवजी आता सेंट अॅन्थोनीज इंन्स्टीट्युट असे करणेत आले आहे.

२) मा. नगर दिवाणी न्यायालयाचे दि.१९/१/२००४ चे आदेशान्वये सेंट अॅन्थोनीज इंन्स्टीट्युटच्या उद्देशांमध्ये सुधारणां करणेंत आली असून त्याप्रमाणे धर्मादाय आयुक्त यांना कळविणेंत आले आहे.

३) सन-२००६ मध्ये सेंट अॅन्थोनीज स्कूल बंद करणेंत आली असून त्याठिकाणी आता सेंट अॅन्थोनीज स्पोर्टस् अॅकॅडमी चालविणेंत येत आहे. या संस्थेकडून बास्केट बॉल, टेनिस, रिंक हॉकी व टेनिस बॉल क्रिकेट ह्या खेळाचे प्रशिक्षण देण्यांत येते. सदरची संस्था नाममात्र शुल्क आकारुन सर्व जाती धर्मांच्या मुला/मुलींना प्रशिक्षण देते. सद्यस्थितीत ३५० शाळा/कॉलेजचे विद्यार्थी सदरच्या मैदानाचा वापर करीत आहेत. मैदानाचा कोणत्याही प्रकारे गैरवापर करणेंत येत नाही.

४) प्रश्नांकित शासकीय जमीन खेळाचे मैदानासाठी भाडेपट्ट्याने देण्यांत आली असून त्याचा त्याच प्रयोजनासाठी वापर करणेंत येत आहे.

## तक्रारदार यांची बाजू:-

तक्रारदार यांनी खालीलप्रमाणे आपली बाजू या प्रकरणामध्ये मांडली आहे.

१) शासनाने संस्थेला शाळेच्या खेळाच्या मैदानासाठी जमीन भाडेपट्ट्याने दिली होती. आता, शाळा कायमस्वरुपी बंद आहे.

२) सध्या सदरची जमीन क्लबच्या सदस्यांसाठी वापरण्यांत येत आहे.

३) सदरचा क्लब मोठ्या प्रमाणात प्रवेश फी आकारुन सदस्यत्व देत आहे.

४) संस्थेने शाळा बंद केली असून शाळेची इमारत पाडून त्या ठिकाणी चार मजली इमारत बांधली आहे. व सदरच्या इमारतीमध्ये साईसा नावाचा क्लब चालविणेंत येत आहे.

५) जे लोक ह्या क्लबचे सदस्य नांहीत त्यांना मैदानावर प्रवेश दिला जात नाही.

६) हे क्रिडांगण शाळेसाठी देण्यांत आले होते. शाळा आता बंद झाली आहे. त्यामुळे या जागेचा उपयोग परिसरातील नागरीकांना/मुलांना फिरण्यांसाठी व खेळण्यासाठी व्हावा.

७) हे क्रिडांगण सर्वांसाठी खुले असले पाहिजे.



Scanned by CamScanner

547

**निष्कर्षः-**

प्रश्नांकित जागा मुळ संस्थेला शाळेतील विद्यार्थ्यांचे खेळण्यांसाठी भाडेपट्ट्याने देण्यांत आली होती. संस्थेचे नांव बदलण्यांत आले असून ते सेंट अँन्थोनी स्कूल ट्रस्ट ऐवजी सेंट अँन्थोनीज इंन्स्टीट्यूट असे करणेंत आले आहे.

आता संस्थेने शाळा बंद केली असून सदरच्या भाडेपट्ट्याच्या व भाडेपट्ट्याने मागणी करणेंत आलेल्या अशा दोनही जागांचा वापर SAISA क्लबच्या सभासदांसाठी करणेंत येत आहे. त्यामुळे शर्तभंग झाला आहे.

उपरोक्त वस्तुस्थितीचा विचार करता मी, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा पुढीलप्रमा[णे] आदेश देत आहे.

## - आदेश -

१) प्रश्नांकित जमीन संस्थेला शाळेच्या मैदानासाठी दिली होती. शाळा बंद झाल्यामुळे आता ही [जागा] सार्वजनिक मैदान म्हणून उपयोगात आणावी.

२) सदर मैदान हे परिसरातील सर्व नागरीकानां खुले ठेवण्यांत यावे.

३) या मैदानावर कोणतीही प्रवेश फी आकारण्यांत येऊ नये.

ठिकाण :- बांद्रा, मुंबई
दिनांक :- 7 JAN 2012 /२०१२

(निर्मल देशमूख)
जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा

प्रती,

१) श्रीमती डॅफनी वारापेन व इतर ३
स्कायलार्क अपार्टमेंट,
डी युनियन पार्क रोड, चुईम,
खार(प.), मुंबई - ४०० ०५२

२) चेअरमन,
सेंट अँन्थेनी इंन्स्टीट्यूट,
१३वा/२१व्या रस्त्याचा कोपरा,
टी.पी.एस.-III, पाली बांद्रा,
मुंबई - ४०० ०५०

प्रत : १) तहसिलदार अंधेरी यांचेकडे माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना.
२) नगर भूमापन अधिकारी, बांद्रा यांचेकडे माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना.



Scanned by CamScanner